# शेतकऱ्यांनो... जमिनी सांभाळा!

शेखर गायकवाड



# प्रस्तावना

वैश्विक संस्कृती, समृध्दी, भौतिकता, व्यवहार, सत्ता, सामर्थ्य, लौकिकत्त्व, अस्मिता या सर्वांना कारणीभूत ठरणारा महत्त्वाचा घटक म्हणजे भूमी होय. हया भूमीतच संस्कृती फुलली, या भूमीनेच लोकव्यवहार घडविले. भूमीचा आश्रय घेऊनच राजसत्ता कार्यरत झाली. शेतीच्या माध्यमातून या भूमीनेच लोकजीवनाला समृध्दीचे वरदान दिले. ज्याच्याकडे जास्त जमीन तोच सामर्थ्यवान ठरला. भूमीच्या रक्षणासाठी आणि भूमीच्याच प्राप्तीसाठी जगातील सर्व युध्दे झाली. भूमीचा मालकी हक्क मिळविण्यासाठीच संघर्ष झाले. मानवाच्या अप्रगत अवस्थेपासून आजच्या आत्यंतिक प्रगत अवस्थेपर्यंत भूमीचे स्थान आणि महत्त्व अबाधित राहिले आहे. या भूमीचे ऋण मान्य करुन भारतात प्राचीन काळापासून कृषि संस्कृती नांदत आली आहे. ऋग्वेदातील एका सूक्तात म्हटले आहे की,

शुनं वाहा: शुनं नर:
शुनं कृषतु लाठ :गलम्.....

बैल आनंदाने आणि लोकही मजेत सहजरीतीने भूमी नांगरो. शेतकरी सहजपणे बैलासह फिरोत. सर्वांना सुख होईल अशा रितीने पर्जन्याच्या उदकरुपी मधुर रसाने जमीन भिजो. कृषि भूमीच्या माध्यमातून सुखाची ठेव निर्माण होवो आणि त्यातून आमचा योगक्षेम उत्तम होवो, अशी अपेक्षा व्यक्त करणारे हे ऋग्वेदातील सूक्त प्राचीन कृषि-संस्कृतीचे मोठेपण सांगत आहे. भारतात अनंत कालापासून उदयास आलेली कृषि संस्कृती आणि कृषि-जीवन हे भारतीयांच्या लोकजीवनाचा आत्मा आहे. समृध्द कृषि जीवन आणि कृषि संस्कृती ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे.

परंतु अलिकडच्या काळात या शेतजमिनीचा ऱ्हास होतो आहे. भाऊबंदकी, गहाणवट, जमिनीची वाटणी आणि होणारे तुकडे शेती पिकविण्यासाठी कष्ट न करण्याची भूमिका, उदासीनता, वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नागरी भौतिकतेचा हव्यास यासारख्या कारणांमुळे शेतीपासून माणूस दुरावला जातो

आहे. पर्यायी शेतजमीन राखण्यापेक्षा ती विकून पैसे मिळविण्यात धन्यता मानली जात आहे. शेती हे मानवी समृध्दीचे खरे वैभव आहे. ते वैभव हरवते आहे. राहिलेली जमीन तरी टिकावी आणि त्यातूनही पुन्हा कृषि-संस्कृति आणि समृध्दी उभी राहावी हया आर्त तळमळीने श्री. शेखर गायकवाड यांनी लिहिलेले 'शेतकऱ्यांनो.... जमिनी सांभाळा ' हे पुस्तक त्यांचे कृषि संस्कृतीशी असणारे नाते दृढ करीत आहे.

श्री. गायकवाड हे स्वत : कृषिशास्त्राचे, समाजशास्त्राचे आणि तत्त्वज्ञानाचे तसेच कायद्याचेही पद्व्युत्तर पदवीधारक आणि अभ्यासक आहेत. शेती, शेतकरी, शेतीविषयक कायदे याचे सखोल चिंतन त्यांनी केले आहे. तर दुसरीकडे शासकीय मुलकी अधिकारी असल्याने शेती - शेतकरी - शेतसमस्या यावरील उपाय हे सर्व प्रत्यक्षात हाताळले आहे. शेतीविषयीचे चिंतन आणि अनुभूती या दोन्ही भूमिकेतून हे पुस्तक वाचकांसमोर येत आहे.

शेती राहावी, शेती टिकावी, शेती पिकावी यासाठी शेतकरी टिकायला हवा. जमीन पिकायला हवी, पिकवायला हवी, ती नुसती पडीक पडायला नको. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी शेतीकडे कसे पहावे याची एक उत्तम ओवी लिहिली आहे.

पुजूनि देवो पाहिजे ।
पेरुनि शेता जाईजे ।

देवाची पूजा करावी आणि मग देवाकडं पहावं तसेच शेती पेरावी, पीक डोलावं आणि मग शेत पहावं. पहाणाऱ्याच्या दृष्टीला आनंदच मिळेल.

एकूण उपलब्ध असणाऱ्या जमिनीपैकी शेतजमीन हळूहळू कमी होत चालली आहे. बिगरशेतीचा वापर आणि विविध कारणांमुळे होणाऱ्या शेतजमिनीच्या संपादनामुळे पिकणाऱ्या जमिनीचे क्षेत्र लहान लहान होत चालले आहे. शेतजमीन पिकण्यापेक्षा ती विकण्यात सार्थक मानले जात आहे. एका गावात औद्योगिकीकरणासाठी जमिनी संपादित केल्या गेल्या. काही बागायती जमिनी सोडल्या त्यात एका शेतकऱ्याची विहीर आणि बागायत जमीन सुटली. विहिरीला

पाणीही भरपूर होते. आता त्याने सुटलेली जमीन चांगली पिकवावी की नाही ? पण विहिरीचे पाणी कारखानदारीला विकून तो भरपूर पैसे मिळवू लागला आणि जमीन मात्र ओस पडली. ही वस्तुस्थिती आहे. जमीन राखण्यापेक्षा ती विकून पैसे मिळविण्यात धन्यता मानली जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना जमिनी राखण्याचे आवाहन करतानाच ते आवाहन पेलण्यासाठी शेतकऱ्यांमधील जमिनीचे वाद, जमीन व्यवहाराचे गुंतागुंतीचे स्वरुप, भाऊबंदकीचा शाप, शेतकरी व न्यायव्यवस्था, शेतकरी आणि महसुली दावे, जमिनीच्या रेकॉर्डस्‌चे महत्त्व, शेतजमिनीचा बाजारभाव, जमिनीबरोबर जमिनीच्या बांधाचेही रक्षण, कर्ज काढताना घ्यावयाची काळजी, जमिनीचे व्यवहार करताना घ्यावयाची दक्षता, भूसंपादन कायदा आणि त्यातील टप्पे या सर्वांचा कायद्याच्या आधारे सूक्ष्म विचार करुन शेतकऱ्यांचा खरा मित्र या नात्याने शेतकऱ्यांना एक जाणीव करुन दिली आहे. गावगाडयात घडणाऱ्या छोटया छोटया प्रसंगातून शेतीविषयक कायद्याची उकल करुन दाखविली आहे. त्यांनी उभे केलेले छोटे छोटे प्रसंग ही गावगाडयातील वास्तवात अवतरलेली ललित कथाच आहे... घडलेला प्रसंग आणि त्याला संबोधून मांडलेला वैधानिक सिध्दांत हा कृषिजागृती विषयी प्रबोधनाच्या पातळीवर नेला आहे. संपूर्ण पुस्तकातील भाषा ही अतिशय सोपी, ओघवती आणि बोलीभाषेच्या स्वरुपातील आहे. कायद्याचे सिध्दांतही कायद्याच्या भाषेत न मांडता सहज समजणाऱ्या बोलीभाषेत अवतरले आहेत. शेतीविषयक दिलेली माहिती ही समग्र आणि सखोल आहे. श्री गायकवाड यांनी शेतीविषयक अनेक व्याख्याने दिली आहेत. कृषि मेळाव्यात शेतकऱ्यांमध्ये ते तळमळीने बोलले आहेत, म्हणून हे पुस्तक म्हणजे शेतकऱ्यांशी साधलेला एक शब्दसंवाद आहे.

'जिथे कर्तृत्वाची नदी अखंड वाहत असते आणि त्यागाची पूजा सदैव चाललेली असते' तिथेच आजच्या हिंदुस्थानातील जिवंत तीर्थे आणि पवित्र क्षेत्रे आहेत', असे प्रसिध्द साहित्यिक वि.स.खांडेकरांनी म्हटले आहे. समर्थपणे शेती पिकविण्याचे कर्तृत्व आणि पैशाच्या हव्यासापोटी शेती न विकता ती राखण्याच्या त्यागाची भूमिका जिथे उभी राहील तिथेच कृषि संस्कृतीची महान तीर्थे उभी रहातील. जमीन आणि शेती हा जनक-जन्य भाव आहे. त्याला शेतकऱ्यांच्या कृषि सेवाभावाची जोड मिळायला हवी. शेती, जमीन आणि शेतकरी ही एक त्रिपुटी आहे.

म्हणून जमीन आणि शेतकरी यांच्यातील अद्वैतभावाचे एक नितळ चिंतन मांडून श्री. शेखर गायकवाड यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून सहजसुंदर कृषि-प्रबोधन घडविले आहे; त्यांच्या या वाङ्मयकृतीचे मन:पूर्वक अभिनंदन!

**पौष व ।। ८ ।। शके १९३१** **डॉ. रामचंद्र देखणे**
**०८ जानेवारी २०१०**

# मनोगत

स्वत :च्या जमिनीपेक्षा शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाची अन्य कोणतीही गोष्ट नाही. गेली २३ वर्षे मी शेतकऱ्यांच्या जमिनीविषयक प्रश्नांशी संबंधित आहे. या काळात मी स्वत :देखील जमिनविषयक हजारो केसेस चालविल्या तसेच महाराष्ट्रातल्या विविध भागातील शेतकऱ्यांशी जमिनीविषयक प्रश्नांसंबंधी सुसंवाद साधला आहे.

केस न चालवता केवळ शेतकऱ्यांना मित्रत्वाच्या नात्याने सल्ला देणारी कोणतीही यंत्रणा आपल्या राज्यात अस्तित्वात नाही. प्रत्येक कायद्याचे स्वतंत्र पुस्तक बाजारात मिळते पण कोणताही निर्णय हा अनेक कायद्यांच्या आधारे व सामाजिक आणि इतर परिस्थिती विचारात घेऊन घेतले जातात. शेतकऱ्यांचा सुध्दा बदलत्या परिस्थितीत सल्ला देणाऱ्यांवर विविध कारणांमुळे विश्वास बसत नाही. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना अचूक मार्गदर्शन मिळत नाही.

शेतकऱ्यांना मध्यवर्ती मानून त्यास मार्गदर्शन करणारे उपयुक्त लेखन असले पाहिजे असे वाटत होते. जमीन व जमीन व्यवहाराची व्याप्ती फार मोठी असल्याने या पुस्तकात त्या विषयी माहिती अंतर्भूत करण्याचा प्रयत्न केला आहे.

हे पुस्तक कायदेविषयक नाही. परंतु ज्याप्रमाणे आजही काही शेतकरी हे शिकलेले नसताना, अनुभवातून, हुशारी व व्यवहारज्ञान दाखवितात तसेच हे शेतजमीन विषयक ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा हा एक प्रयत्न आहे.

माहितीच्या व ज्ञानाच्या या जगात, स्वत :च्या जमिनीबद्दल कोणताही निर्णय घेताना किमान मूलभूत दृष्टीकोन स्वीकारण्यासाठी शेतकऱ्यांना कोणावरही अवलंबून रहावे लागणार नाही व स्वयंस्फूर्तपणे ते स्वत :च्या अडचणी दूर करु शकतील व त्यासाठी त्यांना फार मोठी किंमत मोजावी लागणार नाही, अशी एक माफक अपेक्षा हे पुस्तक लिहिण्यामागे आहे.

शेखर गायकवाड



## श्री शेखर नारायणराव गायकवाड

एम्.एससी. (कृषि), एम्.ए. (समाजशास्त्र)
एम्.ए. (तत्त्वज्ञान), एल.एल.बी.

- ❇ भारतीय कृषि अनुसंधान परिषदेची बहुमोल शिष्यवृत्ती (१९८०-८३), राष्ट्रीय वादविवाद व वक्तृत्त्व स्पर्धेत म. फुले कृषि विद्यापीठाचे नेतृत्त्व, सर्वोत्कृष्ट वक्त्याच्या पारितोषिकाचा बहुमान
- ❇ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (कृषि सेवा वर्ग-१) परीक्षेमध्ये १९८४ साली महाराष्ट्रात सर्वप्रथम, नागरी सेवा परीक्षेमध्ये १९८५ साली उपजिल्हाधिकारी म्हणून निवड
- ❇ कोल्हापूर, सोलापूर, बारामती व पुणे या ठिकाणी उपजिल्हाधिकारी पदावर काम पाहिले, सन १९९९ मध्ये मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव म्हणून काम
- ❇ एप्रिल २००० मध्ये अप्पर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येथे २००४ पर्यंत मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून काम, २००९ पर्यंत अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक या पदावर तर सध्या 'यशदा' येथे निबंधक या पदावर कार्यरत
- ❇ स्पर्धात्मक परीक्षेच्या तयारीसाठी हजारो विद्यार्थांना मार्गदर्शन, राज्यातील पंधरा हजाराहून जास्त महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायदे विषयक प्रशिक्षण, 'यशदा', 'सिम्बायोसिस्', पुणे येथे व्याखाता, जागतिक बँकेमार्फत बँकॉक येथे प्रशिक्षण संस्थांच्या व्यवस्थापना बद्दल आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग (२००९)
- ❇ घरपोच धान्य योजनेची कल्पकतेने आखणी व २००७ पासून नासिक जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी, राज्यभर योजनेला जनतेचा प्रतिसाद, सदर योजनेस राज्य शासनाचा राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार (२००८), भारतातील सर्व राज्याच्या अन्न सचिवांसमोर विज्ञान भवन, दिल्ली येथे घरपोच धान्य योजनेचे सादरीकरण( जुलै २०१०)
- ❇ 'शेतीसंबंधीचे कायदे' या विषयावर दूरदर्शन व आकाशवाणी वरुन व्याख्याने, तसेच बळीराजा, लोकराज्य, शेतकरी, आदर्श शेती व उद्योग इ. नियतकालिकांमध्ये नियमित लेखमाला प्रसिध्द, शेतकऱ्यांना पत्राद्वारे मार्गदर्शन व जाहीर सभांतून व्याख्याने
- ❇ सार्वजनिक व्याख्याने देणे, कथाकथन, चित्र रेखाटन हे छंद
- ❇ 'शेतकऱ्यांनो सावधान'(ऑगस्ट१९९६), 'फेरफार नोंदीची निर्गती-एक आदर्श कार्यपध्दती' (ऑक्टो.१९९९), 'गोष्टीरुप जमीन व्यवहार नीति' (नोव्हें.२००२), 'शेतीचे कायदे'(नोव्हें.२००५), महसूल अधिकाऱ्यांचे अर्धन्यायिक कामकाज(डिसें.२००७), घरपोच धान्य योजना (मे२०१०),कायदा माहितीचा अन् व्यक्ती स्वातंत्र्याचा (ऑगस्ट२०१०) हि पुस्तके प्रकाशित




उत्कृष्ट वाङमय निर्मिती
महाराष्ट्र राज्य पुरस्कार
२००५ - २००६

**www.satbara.co.in**
**www.shekhargaikwad.blogspot.com**